


**About Us:** http://www.galaxyimrj.com/about-us/
**Archive:** http://www.galaxyimrj.com/archive/
**Contact Us:** http://www.galaxyimrj.com/contact-us/
**Editorial Board:** http://www.galaxyimrj.com/editorial-board/
**Submission:** http://www.galaxyimrj.com/submission/
**FAQ:** http://www.galaxyimrj.com/faq/

# 'सर्वा' कथासंग्रह: एक अभ्यास

**पल्लवी मंगेश मेश्राम**
शासकीय विदर्भ ज्ञान-विज्ञान (स्वायत) संस्था,
अमरावती.

माधव सरकुंडे हे आदिवासी साहित्यातील एक महत्वाचे लेखक आहेत. त्यांचा 'सर्वा' हा कथासंग्रह १४ एप्रिल २००० साली प्रसिद्ध झाला आहे. सर्वा हा कथासंग्रह देवयानी प्रकाशन, यवतमाळ, यांनी २००० मध्ये प्रसिद्ध केला आहे. यात एकूण १० कंथाचा समावेश आहे. आदिवासी साहित्य हे फुला फळांचे, दगड धोंड्यांचे साहित्य नसून ते जिवंत माणसाचे सहित्य होय असे कथासंग्रहाच्या प्रस्तावनेत लेखकाने म्हटले आहे.

माधव सरकुंडे याच्या मते ''आज आदिवासी साहित्याने स्वतःचे अस्तित्व उभे केले आहे. आता स्वतंत्र आदिवासी साहित्य संमेलने सुध्दा भरू लागली आहेत.आदिवासी हा भूमीचा मूळनिवासी आहे तो खरा भूमिपुत्र आहे. "[1]

## कथेची संकल्पना

कथाकार इंदुमती शेवडे यांच्या मते 'एकात्म अशा कथात्म अनुभवाची अर्थपूर्ण संघटना म्हणजे कथा. [2]

तसेच वा. ना देशपांडे यांच्या मते कथा म्हणजे, 'कुशल चित्रकार कुचल्याच्या चार दोन फटक्यात संपूर्ण चित्र तयार करतो, तसेच या लघुकथा प्रकाराचेही आहे.[3]

## आदिवासी कथा

महाश्र्वेता देवी या आदिवासींचे हक्क आणि समानता यावर सातत्याने लेखन करत आहे. आदिवासीच्या जीवनातील समस्या आणि विरोधाभास दाखविण्याचा प्रयत्न त्यांनी त्यांच्या 'आदिवासी कथा' या पुस्तकात केला आहे.यांनी आदिवासी ज्या परिस्थितीत आणि मनःस्थितीत आपले जीवन जगत आहेत त्याला शब्दबद्ध केले आहे.

मराठी आदिवासी साहित्यात आतापर्यंत दहा कथासंग्रह आलेले आहेत त्यात दिवाकर कृष्ण यांच्या 'दंडकारण्यातील प्रणयिनी' या आदिवासीएतर कथालेखकाच्या कथेच्या रूपाने मराठी कथेत पहिल्यांदा आदिवासींच्या सांस्कृतिक, सामाजिक जीवनाला स्पर्श झाला.[4] जन्माने आदिवासी असलेल्या लेखकांत, माधव सरकुंडे यांचा 'सर्वा' (२०००), 'ताडमं (२००१), बाबाराव मडावी यांचा 'भाकर' (२०१२), नजुबाई गावित यांचा 'नवसा भिलणीचा एल्गार' (२०१२), उषाकिरण आत्राम यांचा 'अहेर' (१९९६), सुनील गायकवाड यांचा 'भोंगऱ्या' (२०१५), 'गल्लूर' (२०१७), संजय लोहकरे यांचा 'डांगाणी माणसं' (२०१५), ' राब' (१०१८) मारुती आढळ यांचा 'वाघबारस' (२०२३) इ. कथासंग्रह प्रकशित झाले आहेत. [5] माधव सरकुंडे यांच्या 'सर्वा' कथा संग्रहात एकूण दहा कथा आहेत. या कथासंग्रहात या शोधनिबंधात अभ्यास केला आहे.

सर्वा हा आंध आदिवासीच्या जीवनावर प्रकाश टाकणारा महत्वाचा कथासंग्रह आहे. त्यात 'सर्वा', 'डफडं' दीपस्तंभ', 'बरड', 'एस.टी.' 'बैंगणदा', 'लुगडं', 'झड', 'बापू', 'वाट चुकलेली वस्ती' अशा कथांचा समावेश आहे. या सर्व कथांचा वाङ्मयीन अभ्यास येथे केला आहे.

या कथासंग्रहाबद्दल आदिवासी साहित्याचे अभ्यासक तुकाराम रोगंटे म्हणतात, 'सतत दारिद्रयात अडकलेली अंगठेबहादूर माणसे, संसार रेटता रेटता आपल्या पोराबाळांच्या शिक्षणाकडे लक्षच देत नाहीत. असे संदर्भ, आशयकेंद्र या कथासंग्रहात आहे केले

**'सर्वा' कथासंग्रहातील शिक्षण विचार**

'सर्वा', 'दीपस्तंभ' आणि 'बरड' या कथांमध्ये शिक्षणाचे वर्णन खालीलप्रमाणे करण्यात आलले आहे. 'सर्वा' या कथेमध्ये आपल्या मुलांच्या शिक्षणासाठी असलेली एका आईची तळमळ दिसून येते. "मी तुला शिकवणार", "तुला साहेब करणार" अशा वाक्यांतून आपल्या मुलाला सुशिक्षित बनवण्याचा दृढ निश्चय दिसून येतो. शिक्षणासाठी पैसा लागतो. त्यासाठी शहरात कामाला जाण्याची तिची ईच्छा होती, परंतु, घरी अन्नाचा कण नव्हता व तिचा नवरा सुध्दा कामाला

जात नव्हता. या कारणाने तिची शहरात जाऊन काम करण्याची ईच्छा भंग पावली. त्यामुळे ती गावातच इतरांच्या शेतामध्ये मोलमंजुरी करत असे व आपल्या कुंटुंबाचे पालनपोषण करत असे.

सटवीचा नवरा मात्र मुलाच्या शिक्षणाच्या विरुदध होता. त्याला मुलाला शिकवण्यात काही रस नव्हता. सटवी जेव्हा जेव्हा मुलाच्या शिक्षणासंबंधी गोष्ट करत असे, तेव्हा-तेव्हा तो तिच्यावर चिडत होता. यावरून त्याला शिक्षणाचे महत्व नाही हे दिसून येत. मात्र सटवी ही शिकलेली नसून सुध्दा मुलांना शिकविण्यासाठी शेतामध्ये काम करायची व प्रसंगी शिक्षणासाठी शेळी विकण्याची तयारी सुध्दा तिने दाखवली. यातून तिची मुलांना शिकवण्याची धडपड आणि तिला शिक्षणाविषयी असलेले महत्व स्पष्टरित्या दिसून येते.

'दीपस्तंभ' या कथेमध्ये गोविंदराव यांच्या जीवनातील त्यांचा संघर्ष चित्रीत केला आहे. त्यातच लहानपणी असणारी त्याची हालाखीची परिस्थिती दाखवली आहे. त्यांच्या या संघर्षात त्यांनी शिक्षण मिळवण्यासाठी केलेली धडपड आणि जिद्द दिसून आली आहे. शिक्षण घेताना त्यांना आलेल्या असंख्य अडचणींचे वर्णन कथेमध्ये करण्यात आलेले आहे. यवतमाळ जिल्हयात चिंचोली या छोट्याशा व अरुणावती नदी च्या काठी असणाऱ्या गावात गोविंदराव राहत असत या गावात प्राथमिक शिक्षणाची फारशी सोय नव्हती. गावाच्या पाटलाचा हिशोबनीस म्हणून काम करणारा एक बाम्हण मुलांना रात्रीच्या शाळेत शिकवत असे. त्यांच्या वर्गाला गोविंदराव बसत असत. इथेच त्यांचे प्राथमिक शिक्षण पूर्ण झाले. पुढील शिक्षणासाठी यवतमाळ येथे आल्यानंतर त्यांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागले. त्यांच्या पुढे न झुकता त्यांनी एस.एस.सी उत्तीर्ण केली. त्यानंतर त्यांच्यात असलेल्या ज्ञान जिज्ञासेने त्यांना स्वस्थ बसू दिले नाही. त्यामुळे त्यांना पुढे शिक्षण घेण्याचे ठरविले. त्यांच्या जिज्ञासू वृत्ती मुळे त्यांना राजस्थानला पिलानी येथे घनश्यामदास बिर्ला यांच्या महाविद्यालयात गरीब विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण असल्याचे कळले. परंतु तिथे जाण्याची सोय नसल्यामुळे त्यानी आडत सुरू करून काही पैसे कमावले व राजस्थान जाण्याची सोय केली. आपल्या कुशाग्र व चाणक्ष बुध्दीने तिथे प्रवेश मिळवला व इंटरमिडीएट शिक्षण पूर्ण केले त्यांची शिक्षणाविषयी असलेली ओढ त्यांना ग्रॅज्युएशन करण्यापासून रोखू शकली नाही. त्यांनी

त्यांचे ग्रॅज्युएशन उत्तरप्रदेश मधील सिध्दार्थ महाविद्यालयात पूर्ण केले. हा शिक्षणाचा संघर्ष कथेच्या केंद्रस्थानी आहे.

माधव सुरकुंडे यांच्या 'सर्वा' कथासंग्रहातील शिक्षणाचा उल्लेख आलेल्या कथा पैकी काहीच कथेमध्ये शिक्षणाचे वर्णन आलेले आहे. त्यापैकी 'बरड' या कथेमध्ये प्राथमिक शिक्षणाची सोय असल्याचे वर्णन आले आहे. त्या गावामध्ये इयत्ता तिसरी पर्यंत शिक्षणाची सोय होती. व उच्च शिक्षणासाठी परगावी जावे लागे. परंतु परगावी जाण्यासाठी दळणवळणाची व्यवस्था नसल्यामुळे. रघू आणि खंडू या दोघांना वर्गाला जायला उशीर होत अल्याचे चित्रण या कथेमध्ये करण्यात आलेले आहे.

**'सर्वा' मधील दारिद्रय**

'सर्वा' कथासंग्रहामध्ये 'दीपस्तंभ', 'बैंगणदा' आणि 'बापू' या कथांमध्ये दारिद्रयाचे वर्णन  खालीलप्रमाणे करण्यात आलेले आहे.

"साधारणपणे एखादी अत्यावश्यक गरज पूर्ण करण्यासाठी असलेली संसाधनांची अपर्याप्तता म्हणजे दारिद्रय होय." असे मला वाटते.

'दीपस्तंभ' या कथेमध्ये अनेक ठिकाणी दारिद्रयाचा उल्लेख आलेला आहे. शिक्षण घेताना गोविंदरावांना येणाऱ्या अडचणींमध्ये सर्वात मोठी अडचण ही आर्थिक अडचण होती. मिळालेल्या शिष्यवृत्ती मध्ये फक्त जेवणाची सोय होत असल्यामुळे गोविंदरावांना मंदिरात रहावे लागत असे.  शिक्षणासाठी बाहेर गावी जाण्यासाठी सुध्दा पैशांची अडचण त्यांना येत होती यातुन त्यांचे दारिद्रय दिसून येते. तसेच, गावात वास्तव्यास असणाऱ्या आदिवासी समाजात प्रचंड दारिद्रय दिसून येते. नदीला येणाऱ्या सततच्या पुरामुळे या गरीब लोकांचे छळ होत असत यातून त्यांचे दारिद्रय निदर्शनास येते.

'बैंगणदा' या कथेतील मुख्य पात्र बैंगणदा व त्याच्या परिवारावर असलेल्या दारिद्रयाचे वर्णन आले आहे. जीवनाचा गाडा चालवण्यासाठी व पोटाची भूक भागवण्यासाठी बैंगणदा ला विविध  करतो. त्यातूनच त्याच्या कुटुंबाचे पालनपोषण होत असे. जीवन जगण्यासाठी पैसे  लागतात त्यासाठी बैंगणदा सुतार काम करत असे. सोबतच थोडे पैसे व पोट भरण्यासाठी बैंगणदा हा मासोळया पकडण्याचे काम सुद्धा

करतो. एखादया वेळी त्याला पैसे मिळत असे, परंतु बैंगणदा त्याच मासोळ्या खाऊन आपली भूक भागवतो. यातून त्यांच्या मध्ये असलेले प्रचंड दारिद्रय दिसून येते.

'बापू' या कथेमध्ये सुध्दा सुप्तपणे लेखकाने दारिद्र्याचा उल्लेख केला आहे. कुटुंबाचा असलेला मोठा आकार त्यांना शिकवण्यासाठी आणि दोन वेळेचे जेवण देण्यासाठी बापूला धडपड करावीच लागली. बापू अनेक कामांमध्ये पटाईत होते. सरकारकडून मिळालेल्या नवाटीमध्ये दिवसरात्र काबाडकष्ट करून त्यांनी आपल्या जवाबदाऱ्या पार पाडल्या .फावल्या वेळात सुध्दा ते शांत बसत नसून नेहमी कामात असायचे. घराला लागणारा दोर असेल किंवा झोपण्यासाठी लागणारी बाज असेल, ते स्वतः बनवत असत. शिवाय एवढया मोठ्या कुटुंबाला पोसण्यासाठी पैसा लागतो. तो उभा करण्यासाठी ते दारू पाडत व विकत. यातून मिळणाऱ्या पैशातून त्यांचा उदरनिर्वाह होत असे. या सगळ्या प्रसंगांमधून बापूंच्या कुटुंबामध्ये असलेले दारिद्रय निदर्शनास येते.

**'सर्वा' मधील अंधश्रद्धा-**

'सर्वा' या कथासंग्रहामध्ये 'डफडं' आणि 'बरड' या दोन कथांमध्ये अंधश्रद्धेचा उल्लेख आलेले आहे.

समाजमान्यतेनुसार अनेक प्रथा या अंधश्रद्धेत वेढलेल्या असतात. त्यापैकी एकीचा उल्लेख 'डफडं' या कथेमध्ये दिसुन येतो. अनेक समाजाच्या प्रथेमध्ये माणूस मेल्यावर त्याच्या माथ्यावर पैसे चिपकवल्या जाते. यासंबंधीचा उल्लेख कथेत दिसून येतो. कथेमधील मुख्य पात्र हा डफडं वाजवत असतो. अनेक हौशी लोक त्यांच्या या कर्तव्याची कमाल बघण्यासाठी रसिक, मातीत नाणे फेकत असे. त्या पैशाला तो हात न लावता उचलायची कर्तबगारी करुन दाखवायचा त्यासाठी मातीत पडलेले नाण तो आपल्या कपाळाने उचलत असे. अनेक मान्यतेनुसार कपाळावर पैसा हा मेल्यानंतर चिपकवतात. पण पात्रला त्या अंधश्रद्धेत विश्वास नसून लेखकाने त्याच्या या कार्याची तुलना अंधश्रध्दा निर्मूलन समितीशी केली आहे व विज्ञाननिष्ठ व्यक्ती म्हणून त्याचा उल्लेख केलेला दिसून येतो.

भूत लागल्याच्या अनेक कथा आपण ऐकलेल्या असतात.तशाच प्रकारच्या एका कथेचे वर्णन लेखकाने 'बरड' या कथेमध्ये केले आहे. एखाद्या विशिष्ट ठिकाणी भूत

असतो तिथुन गेल्यास तो आपल्या अंगात शिरतो, असा प्रसंग कथेत आला आहे. कथेमधील मुख्य पात्र खंडू व त्याच्या मित्रासोबत झालेल्या या प्रसंगामधून लेखकाने गावातील अज्ञान व अंधश्रध्देबद्दल जागृती केली आहे. एक विशिष्ट प्रेतआत्मा अनेकांना छळते, घाबरवते या मान्यतेवरून या कथेची मांडणी करण्यात आलेली आहे. त्या ठिकाणी असणाऱ्या प्रेत आत्म्याने खंडू व त्याचा मित्र रघू याला त्रास दिल्याचे दिसते व गावकऱ्यांची तशी मान्यता आहे.

परंतु प्रत्यक्षात पाहता त्या ठिकाणी असणाऱ्या एका वेड्या स्त्री च्या सावलीने लोकांच्या मनात धारणा बसत असे. सर्व लोकांनी त्या गोष्टीचा शोध घेण्यासाठी मेल्यानंतर तिथे असलेल्या वेड्या स्त्री लाच प्रेतआत्मा समजून तिला मारहान करुन तिचा बळी घेण्यास आला यातून गावामध्ये गावकऱ्यांच्या मध्ये प्रचंड अंधश्रद्धा असल्याचे दिसते.

एकूण आदिवासी कथांबद्दल, संजय लोहकरे यांनी खालील अभिप्राय दिला आहे. आदिवासींच्या या एकूणच नव्वदोत्तर मराठी कथेतून काही महत्वाचे निष्कर्ष मांडता येतील. निसर्ग हा आदिवासी कथेचा केंद्रबिंदू, तर पर्यावरणीय, मानवतावादी, भूतदयावादी जाणीव हे आशयकेंद्र आहे. योजनारहित जीवन हा गाभा. जीवनाला आलेला एकाकीपण कथेत जाणवत नाही. या कथा म्हणजे आदिवासींची प्रतिसृष्टी आहे.[7]

## समारोप

माधव सरकुंडे यांच्या 'सर्वा' कथासंग्रहात (२०००) आदिवासींची अंधश्रध्दा, जगण्यासाठीचा जीवनसंघर्ष आलेला आहे. हे लोक भूताखेतावर विश्वास ठेवतात.दारिद्रयात जीवन जगतात शिक्षणाकडे दूर लक्ष करतात. या विविध घटकांचा चिकित्सक अभ्यास करण्यात आला आहे.

आदिवासी जीवन, सद्य:स्थिती केवळ काल्पनिक आहे.आदिवासींच्या हदयाच्या पडद्या आड चाललेले आणि प्रत्यक्ष पडद्यावर अभिव्यक्त होणारे जीवन समजून घेता येईल असा हा कथासंग्रह आहे.

## निष्कर्ष -

1) 'सर्वा' या कथासंग्रहात आदिवासींच्या जीवनातील शैक्षणिक समस्या आलेल्या आहेत.
2) 'सर्वा' या कथासंग्रहात अंधश्रध्दा निर्मुलनाचा उपदेश केलेला आहे.
3) 'सर्वा' या कथासंग्रहात सतत दारिद्रयात अडकलेली अंगठेबहादूर माणसे संसार रेटताना दिसतात..
4) या कथासंग्रहात आदिवासी लोकांच्या जीवनसंघर्ष रेखाटलेले आहे.

**संदर्भग्रंथ -**


1) सरकुंडे, माधव, सर्वा, देवयानी प्रकाशन, यवतमाळ, प्र. भा. २०००
2) संपादक : शिरीष लांडगे, दिलीप पवार, डॉ. संदीप सांगळे (२०१९), समकालीन मागि कथा, पुणे अक्षरबंध प्रकाशन. पृ. ६.
3) तत्रैव, पेज नं. 7
4) https://vaniprakashan.com
5) मारुती,आढळ यांचा 'वाघबारस' २०२३
6) लोहकरे, संजय, चळवळ आणि साहित्य, मेधा पब्लिशिंग हाऊस, अमरावती, प्र-अ. २०२३.
7) तत्रैव, पेज नं. 97